**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**

पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
☎ (०२५६४) २३०००९
✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक २५/०७/२०२४.

## —: प्रेसनोट :—

**आलोसे क्र.१) विजय दत्तात्रय लोंढे, वय ३९ वर्षे,गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकुवा रा. पिंप्राळा जळगाव जि.जळगाव २) रविंद्र सुकदेव लाडे वय ४७ वर्षे, सहाय्यक लेखाधिकारी नेम- पंचायत समिती अक्कलकुवा, रा. द्वारका नगर नंदुरबार जि. नंदुरबार व आरोपी लोकसेवकयांनी २६,०००/-रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत.**

| घटक | नंदुरबार |
|---|---|
| **गुन्हा नोंद क्रमांक** | अक्कलकुवा पोलीस स्टेशन गु. रजि. नं. २७१/२०२४ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,७अ,१२ व भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.) २०२३ कलम २३८ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | **आलोसे क्र १) विजय दत्तात्रय लोंढे, वय ३९ वर्षे,गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकुवा रा. पिंप्राळा जळगाव जि.जळगाव २) रविंद्र सुकदेव लाडे वय ४७ वर्षे, सहाय्यक लेखाधिकारी नेम- पंचायत समिती अक्कलकुवा, रा. द्वारका नगर नंदुरबार जि. नंदुरबार व आरोपी लोकसेवक** |
| **एकुण मागणी केलेली लाचेची रक्कम** | **२६,०००/-रुपये** (सव्वीस हजार रु.) |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | **२६,०००/-रुपये** (सव्वीस हजार रु.) |
| **थोडक्यात माहिति** | यातील मुळ तक्रारदार यांनी पंचायत समीती अक्कलकुवा व ग्रामपंचायत डाब अंतर्गत एकूण तीन अंगणवाडयांचे बांधकाम पूर्ण केले आहे. नमुद तिन्ही कामांच्या बिलांची रक्कम ग्रामपंचायतीच्या खात्यावर वर्ग करण्यासाठी तक्रारदार यांनी आलोसे क्रमांक दोन यांना वेळोवेळी पाठपुरावा केला परंतु तक्रारदार यांची बिलाची रक्कम आलोसे यांनी ग्रामपंचायतीच्या खात्यावर वर्ग केली नाही.. यानंतरही तक्रारदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला असता, आलोसे यांनी तक्रारदार यांच्या एका कामाचे बिल २,४६,८५०/-रु.ग्रामपंचायतीच्या खात्यावर वर्ग केले जे तक्रारदार यांना त्यांच्या बॅक खात्यात मिळाले. परंतु आलोसे क्रमांक २ यांनी तक्रारदार यांचे एक बिल काढून दिल्याचा मोबदला व उर्वरित दोन बिलांची रक्कम काढण्यासाठी अशा एकूण तिन्ही बिलांच्या रक्कमेबाबत तक्रारदार यांच्या कडून स्वत:साठी ८,०००/-रु ची मागणी केली व आलोसे क्रमांक १ यांच्यासाठी १८,०००/-रु ची मागणी केली. आज रोजी पंचासमक्ष केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे कमांक २ यांनी ८,०००/-रु लाचेची रक्कम तक्रारदार यांचे कडून स्वीकारली .व आलोसे क्रमांक १ यांनी स्विकारलेली १८०००/- रुपये लाचेची रक्कम पुरावा नष्ट करण्याच्या हेतुने कोठेतरी गहाळ केली आहे. तसेच आलोसे क्रमांक १ यांनी तक्रारदार यांच्याकडून लाच मागण्याच्या व लाच स्वीकारण्याच्या कृतीस आलोसे क्रमांक २ यांना प्रोत्साहन दिले म्हणून गुन्हा. |

| | |
|---|---|
| **कामगिरी पथक** | सदर कामगिरी मा.पोलीस अधीक्षक सो, श्रीमती. शर्मिष्ठा घारगे-वालावलकर, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, मा.अप्पर पोलीस अधिक्षक सो., श्री.माधव रेड्डी, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस निरीक्षक,श्री स्वप्निल राजपूत (वाचक) ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस उपअधीक्षक, श्री राकेश आनंदराव चौधरी ला.प्र.वि.नंदुरबार,यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा/विलास पाटील ,पोहवा/ विजय ठाकरे, ,पोहवा/देवराम गावीत, पोना/नरेंद्र पाटील,पोना/ सुभाष पावरा पोना/ हेमंतकुमार महाले चापोना/ जितेंद्र महाले सर्व नेमणूक - ला.प्र.वि.नंदुरबार. अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार, पथकाने केली आहे. |
| **सापळा अधिकारी** | श्री राकेश आनंदराव चौधरी पोलीस उपअधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार |
| **तपास अधिकारी** | श्री राकेश आनंदराव चौधरी पोलीस उपअधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोवसेवकाबाबत तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.


संपर्क पत्ता: ला.प्र.वि., नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई—मेल: dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/अॅप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४— २३०००९,२३१००९


(राकेश आनंदराव चौधरी)
पोलीस उप अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार